**L. A. BILL No. XXII OF 2022**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ४३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, हे कलम तात्काळ अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि अशा कोणत्याही तरतुदींमधील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात येण्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे ), याच्या कलम १६ मध्ये,— २०१७ चा महा. ४३.

(क) पोट-कलम (२) मधील,—

(एक) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(खक) कलम ३८ अन्वये अशा नोंदणीकृत व्यक्तीला कळविलेल्या उक्त पुरवठ्याच्या बाबतीत, निविष्टी कराच्या जमा रकमेचे तपशील, निर्बंधित करण्यात आले नसतील;";

(दोन) खंड (ग) मधील, "किंवा कलम ४३क" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) मधील, "सप्टेंबर महिन्याकरिता कलम ३९ अन्वये विवरण दाखल करण्याच्या किंवा संबंधित वार्षिक विवरण दाखल केल्याच्या, यापैकी जे अगोदर घडेल त्या नियत दिनांकानंतर" या मजकुराऐवजी, "तीस नोव्हेंबर नंतर किंवा संबंधित वार्षिक विवरण दाखल केल्यानंतर, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(क) खंड (ख) मधील, "तीन लागोपाठच्या कर कालावधीचे विवरण" या मजकुराऐवजी, " वित्तीय वर्षाचे विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन महिन्यांपर्यंत उक्त विवरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) खंड (ग) मधील, "सहा महिन्यांच्या सलग कालावधीसाठी" या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल अशा सलग कर कालावधीसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "सप्टेंबर महिन्याच्या" या मजकुराऐवजी, "तीस नोव्हेंबरच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) "दहाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी विहित करण्यात येईल" या मजकुरानंतर, "अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून आणि" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) "उक्त पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्यास विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने कळविण्यात येईल" या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, अशा मुदतीत व अशा रीतीने, उक्त पुरवठ्यांच्या प्राप्तकर्त्यास कळविण्यात येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) पहिले परंतुक वगळण्यात येईल;

(चार) दुसऱ्या परंतुकामधील, "परंतु आणखी असे की" या मजकुराऐवजी, "परंतु" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(पाच) तिसऱ्या परंतुकामधील, "परंतु तसेच" या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल;

(ग) पोट-कलम (३) मधील,—

(एक) "आणि कलम ४२ किंवा कलम ४३ अन्वये त्यामध्ये विसंगती असेल" हा मजकूर वगळण्यात येईल;

(दोन) पहिल्या परंतुकामधील, "सप्टेंबर महिन्यासाठी, कलम ३९ अन्वये विवरण दाखल केल्यानंतर" या मजकुराऐवजी, "तीस नोव्हेंबरनंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(घ) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४) जर एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीद्वारे, मागील कर कालावधीपैकी कोणत्याही कर कालावधीसाठी जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्यात आलेले नसतील तर, तिला कर कालावधीसाठी पोट-कलम (१) अन्वये जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्याची मुभा दिली जाणार नाही:

परंतु, नोंदणीकृत व्यक्तीने जरी मागील एका किंवा अधिक कर कालावधींसाठी जावक पुरवठ्यांचे तपशील सादर केले नसतील तरी देखील, शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्यासाठी अशा नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला मुभा देता येईल.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३८ ऐवजी कलम दाखल करणे.

"**३८.** (१) कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदणीकृत व्यक्तीने सादर केलेल्या जावक पुरवठ्यांचे आणि विहित करण्यात येतील अशा इतर पुरवठ्यांचे तपशील, आणि निविष्टी कराच्या जमा रकमांचा तपशील अंतर्भूत असणारे स्वयं-निर्मित विवरणपत्र, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात व अशा रीतीने, अशा मुदतीत आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, अशा पुरवठ्यांच्या प्राप्तकर्त्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उपलब्ध करून देण्यात येतील. आवक पुरवठा व निविष्टी कर जमा रकमा यांचा तपशील कळविणे.

(२) पोट-कलम (१) खालील स्वयं-निर्मित विवरणपत्रात, पुढील तपशिलांचा समावेश असेल :—

(क) ज्याच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम प्राप्तकर्त्याला प्राप्त होईल त्या आवक पुरवठ्याचे तपशील; आणि

(ख) (एक) विहित करण्यात येईल अशा नोंदणी करून घेण्याच्या कालावधीत कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(दोन) जिने कर भरण्यात कसूर केली असेल आणि जेव्हा अशी कसूर विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी चालू राहिली असेल तेव्हा, अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(तीन) विहित करण्यात येईल अशा कालावधीमध्ये उक्त पोट-कलमान्वये जिने सादर केलेल्या जावक पुरवठ्यांच्या विवरणपत्रानुसार, जिच्याकडून प्रदेय असलेला उद्विष्टी कर, विहित करण्यात येईल अशा मुदतीच्या उक्त कालावधीमध्ये, तिने प्रदान केलेल्या उद्विष्टी करापेक्षा अधिक असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(चार) जिने विहित करण्यात येईल अशा मुदतीत खंड (क) नुसार तिला निविष्टी कराची जी रक्कम प्राप्त होऊ शकली असती त्या जमा रकमेऐवजी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक रकमेचा दावा केलेला असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(पाच) जिने विहित करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, कलम ४९ च्या पोट-कलम (१२) च्या तरतुदींनुसार तिचे कर दायित्त्व फेडण्यात कसूर केली असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(सहा) विहित करण्यात येईल अशा व्यक्तींच्या अन्य वर्गाद्वारे,

कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये सादर करण्यात येणाऱ्या उक्त पुरवठ्यांच्या तपशिलांच्या बाबतीत ज्याच्या बाबतीत अशा जमा रकमा,-मग त्या पूर्णतः असो की अंशतः असो,- प्राप्तकर्त्याला प्राप्त होऊ शकत नाहीत त्या पुरवठ्यांचे तपशील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये,—

(क) पोट-कलम (५) मधील, "वीस" या मजकुराऐवजी, "तेरा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (७) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

"परंतु, पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये विवरण सादर करणारी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती,–

(क) एका महिन्यातील वस्तूंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आवक व जावक पुरवठा, प्राप्त झालेल्या निविष्टी कराच्या जमा रकमा, प्रदेय असलेला कर आणि असे अन्य तपशील विचारात घेऊन, देय कराइतकी रक्कम; किंवा

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेऐवजी, विहित करण्यात येतील अशा रीतीने आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, निर्धारित केलेली रक्कम,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, आणि अशा मुदतीत, शासनास प्रदान करील.";

(ग) पोट-कलम (९) मधील,—

(एक) "कलम ३७ व ३८ च्या तरतुदींना अधीन राहून, जर" या मजकुराऐवजी, "जेव्हा" हा शब्द आणि "आढळून येईल तर" या मजकुराऐवजी, "आढळून येईल त्याबाबतीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) परंतुकामधील, "सप्टेंबर महिन्यासाठीचे किंवा दुसऱ्या तिमाहीसाठीचे विवरण दाखल करण्यासाठीच्या देय दिनांकानंतर" या मजकुराऐवजी, "तीस नोव्हेंबरनंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(घ) पोट-कलम (१०) मध्ये, "त्याने कोणत्याही पूर्वीच्या कर कालावधीचे विवरण दाखल केलेले नसेल तर, अशा कर कालावधीचे विवरण दाखल करण्याची अनुमती नसेल," या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"तिच्याकडून कोणत्याही पूर्वीच्या कर कालावधीचे विवरण किंवा उक्त कर कालावधीसाठी कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये जावक पुरवठ्यांचा तपशील सादर करण्यात आला नसेल तर, अशा कर कालावधीचे विवरण सादर करण्याची मुभा दिली जाणार नाही :

परंतु, जरी नोंदणीकृत व्यक्तीने किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाने मागील एका किंवा अधिक कर कालावधीचे विवरण सादर केले नसेल किंवा उक्त कर कालावधीसाठी कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये जावक पुरवठ्यांचे तपशील सादर केलेले नसतील तरी देखील शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, अशा नोंदणीकृत व्यक्तीस किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला विवरण सादर करण्याची मुभा देता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४१ ऐवजी दाखल करणे.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

निविष्टी कराची जमा रक्कम मिळणे.

"**४१.** (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, विहित करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, तिच्या विवरणात स्वयंनिर्धारित केलेली पात्र निविष्टी कराची जमा रक्कम मिळण्यास हक्कदार असेल आणि अशी रक्कम, तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये जमा करण्यात येईल.

(२) ज्यावरील प्रदेय असलेला कर पुरवठादाराकडून प्रदान करण्यात आलेला नाही, अशा वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या अशा पुरवठ्यांच्या बाबतीत, पोट-कलम (१) अन्वये एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीकडून मिळालेली निविष्टी कराची जमा रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने, उक्त व्यक्तीकडून अनुज्ञेय व्याजासह परत करण्यात येईलः

परंतु, जेव्हा उक्त पुरवठादार, उपरोक्त पुरवठ्यांच्या बाबतीत प्रदेय असलेल्या कराचे प्रदान करील तेव्हा, उक्त नोंदणीकृत व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने, तिने परत केलेली जमा रक्कम पुन्हा मिळविता येईल.".

**९.** मुख्य अधिनियमाची कलमे ४२, ४३ व ४३क वगळण्यात येतील. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याची कलमे ४२, ४३ व ४३क वगळणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४७ ची सुधारणा.

(क) "किंवा आवक" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) "किंवा कलम ३८" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ग) "कलम ३९ किंवा कलम ४५" या मजकुरानंतर, "किंवा कलम ५२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "कलम ३८ अन्वये आवक पुरवठ्यांचे तपशील", हा मजकूर वगळण्यात येईल. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये,— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मधील, "किंवा कलम ४३क" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) मधील, "अशा शर्तीना" या मजकुरानंतर "व निर्बंधांना" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ग) पोट-कलम (११) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः—

"(१२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, शासनास, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे नोंदणीकृत व्यक्तीद्वारे किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाद्वारे इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीद्वारे जे फेडता येईल अशा या अधिनियमाखालील किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १३.) खालील उद्दिष्टी कर दायित्वाचे कमाल प्रमाण, परिषदेच्या शिफारशींवरून, अशा शर्तीना व निर्बंधांना अधीन राहून, विनिर्दिष्ट करता येईल.".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, १ जुलै, २०१७ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईलः— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५० ची सुधारणा.

"(३) जेव्हा निविष्टी कराची जमा रक्कम, चुकीने मिळवण्यात व वापरण्यात आली असेल त्याबाबतीत, नोंदणीकृत व्यक्ती, चुकीने मिळविलेल्या व वापरलेल्या अशा निविष्टी कराच्या जमा रकमेवर, परिषदेच्या शिफारशींवरून, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे चोवीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने व्याज प्रदान करील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने व्याजाची परिगणना करण्यात येईल.".

(शा.म.मु.) एचबी ९२६-२ (३००—८—२०२२)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये, पोट-कलम (६) मधील परंतुकामध्ये, "सप्टेंबर महिन्याचे विवरणपत्र दाखल करण्यासाठी असलेल्या नियत दिनांकानंतर" या मजकुराऐवजी, "तीस नोव्हेंबरनंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या . कलम ५४ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील परंतुकामध्ये, "अशा रीतीने कलम ३९ अन्वये सादर केलेल्या विवरणातील" या मजकुराऐवजी, "अशा नमुन्यात व रीतीने" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२) मधील, "सहा महिन्यांचा" या मजकुराऐवजी, "दोन वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ग) पोट-कलम (१०) मधील, "पोट-कलम (३) अन्वये" हा मजकूर वगळण्यात येईल;

(घ) स्पष्टीकरणामधील, खंड (२) मधील, उप-खंड (ख) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(खक) विशेष आर्थिक प्रक्षेत्र विकासकास किंवा विशेष आर्थिक प्रक्षेत्र युनिटास वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा शून्या-दरित पुरवठा करण्याच्या बाबतीत, जेव्हा अशा पुरवठ्यांच्या बाबतीत किंवा, यथास्थिति, अशा पुरवठ्यांमध्ये वापरलेल्या निविष्टी किंवा निविष्टी सेवा यांच्या बाबतीत, प्रदान केलेल्या कराचा परतावा उपलब्ध झाला असेल तेव्हा, अशा पुरवठ्यांच्या बाबतीत कलम ३९ अन्वये विवरण सादर करण्याचा नियत दिनांक;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १४६ अन्वये काढलेल्या अधिसूचनेची भूतलक्षी प्रभावाने सुधारणा.

**१६.** (१) मुख्य अधिनियम याच्या कलम १४६ अन्वये, परिषदेच्या शिफारशींवरून, राज्य शासनाने काढलेली, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक-१०१८/प्र.क्र.१३/ कराधान-१ (अधिसूचना क्र.९/२०१८- राज्य कर), दिनांक २४ जानेवारी, २०१८, यामध्ये, पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास व तेव्हापासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्यात येईल आणि सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, जणू काही राज्य शासनाला, मुख्य अधिनियम याच्या कलम १४६ अन्वये, सर्व महत्वाच्या वेळी, उक्त अधिसूचनेत भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्याचा अधिकार होता असे समजून, राज्य शासनास, उक्त पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत भूतलक्षी प्रभावाने, सुधारणा करण्याचा अधिकार असेल आणि सुधारणा केली आहे असे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५० ची पोट-कलमे (१) व (३), कलम ५४ चे पोट-कलम (१२) आणि कलम ५६ अन्वये काढलेल्या अधिसूचनेची भूतलक्षी प्रभावाने सुधारणा.

**१७.** (१) मुख्य अधिनियमाच्या, कलम ५० ची पोट-कलमे (१) व (३), कलम ५४ चे पोट-कलम (१२) आणि कलम ५६ याअन्वये, परिषदेच्या शिफारशींवरून, राज्य शासनाने काढलेली, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक-१०१७/प्र.क्र. १०३(२०)/ कराधान-१, दिनांक २९ जून, २०१७ यांमध्ये, दुसऱ्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास व तेव्हापासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्यात येईल आणि सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, जणू काही राज्य शासनाला, मुख्य अधिनियमाच्या, कलम ५० ची पोट-कलमे (१) व (३), कलम ५४ चे पोट-कलम (१२) आणि कलम ५६ यांअन्वये, सर्व महत्वाच्या वेळी, उक्त अधिसूचनेत भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्याचा अधिकार होता असे समजून, राज्य शासनास उक्त पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत भूतलक्षी प्रभावाने, सुधारणा करण्याचा अधिकार असेल आणि सुधारणा केली आहे असे मानण्यात येईल.

**१८.** (१) मुख्य अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (१) खालील अधिकारांचा वापर करून, परिषदेच्या शिफारशींवरून, राज्य शासनाने काढलेली, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक १०१७/ प्र.क्र.१०४/ कराधान-१ (अधिसूचना क्र. ०१/२०१७- राज्य कर (दर)), दिनांक २९ जून, २०१७ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ जुलै, २०१७ पासून प्रारंभ होणाऱ्या आणि ३० सप्टेंबर २०१९ रोजी समाप्त होणाऱ्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीमध्ये मत्स्य तेलासाठी असेल त्याखेरीज, मत्स्य भुकटीचे (शीर्ष २३०१ खाली येणाऱ्या) उत्पादन करताना, निर्माण झालेल्या अनपेक्षित टाकाऊ पदार्थाच्या पुरवठ्याच्या बाबतीत, कोणताही राज्य कर आकारला किंवा संकलित केला जाणार नाही.

विवक्षित प्रकरणांमध्ये राज्य कर आकारण्यापासून किंवा संकलन करण्यापासून भूतलक्षी प्रभावाने सूट.

(२) जे संकलित करण्यात आले आहे, परंतु पोट-कलम (१) हे सर्व महत्त्वाच्या वेळी, अंमलात राहिले असते तर, अशाप्रकारे जे संकलित करता आले नसते, अशा सर्व करांचा परतावा दिला जाणार नाही.

**१९.** (१) मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) खालील अधिकारांचा वापर करून, परिषदेच्या शिफारशींवरून, राज्य शासनाने काढलेली, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक १०१९/ प्र.क्र.११६(११)/कराधान-१ (अधिसूचना क्र. २५/२०१९- राज्य कर (दर)), दिनांक १ ऑक्टोबर, २०१९ ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, १ जुलै, २०१७ रोजी व तेव्हापासून, सर्व प्रयोजनांकरिता अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीकरिता अंमलात असेल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये काढलेली अधिसूचना भूतलक्षी प्रभावाने अंमलात आणणे.

(२) जे संकलित करण्यात आले आहे, परंतु पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली अधिसूचना, सर्व महत्त्वाच्या वेळी, अंमलात राहिली असती तर, अशाप्रकारे जे संकलित करता आले नसते, अशा सर्व राज्य कराचा परतावा दिला जाणार नाही.

## पहिली अनुसूची

[कलम १६(१) पहा]

| अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक<br>(१) | सुधारणा<br>(२) | सुधारणा अंमलात आल्याचा दिनांक<br>(३) |
|---|---|---|
| शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक-१०१८/प्र.क्र. १३/ कराधान-१ (अधिसूचना क्रमांक ९/ २०१८-राज्य कर), दिनांक २४ जानेवारी, २०१८. | उक्त अधिसूचनेमध्ये, परिच्छेद १ मधील, "विवरणपत्रे सादर करणे आणि एकात्मिक कराची संगणना करणे व तडजोड करणे", या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल:—<br>'विवरणपत्र सादर करणे आणि एकात्मिक कराची संगणना व तडजोड करणे आणि शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक-१०१९/प्र.क्र. १५३/ कराधान-१, दिनांक १ जानेवारी, २०२० यामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर नियम, २०१७ अन्वये तरतूद केलेली सर्व कार्ये.". | २२ जून, २०१७. |

## दुसरी अनुसूची

[कलम १७(१) पहा]

| अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक (१) | सुधारणा (२) | सुधारणा अंमलात आल्याचा दिनांक (३) |
|---|---|---|
| शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वसेक-१०१७/ प्र.क्र. १०३(२०) / कराधान-१, दिनांक २९ जून, २०१७. | उक्त अधिसूचनेमध्ये, तक्त्यामधील, अनुक्रमांक २ समोरील, स्तंभ (३) मधील, "२४" या अंकाऐवजी "१८" हा अंक दाखल करण्यात येईल. | १ जुलै, २०१७. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२. ]**

**[ महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. एकनाथ संभाजी शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई